MHJN060006022015

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ३६/२०१५**
**भुजंगराव –वि– तेजराव**

## निशाणी क्रमांक २५ वर आदेश पारीत

१) प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुत अर्जाद्वारे वादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा त्यांनी दावा मिळकतीबाबत प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाई ताकीदासाठी दाखल केलेला असून तो साक्षी–पुराव्यासाठी प्रलंबित आहे. परंतु सदर दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादीचे लगत असलेला दक्षिणोत्तर बांध पश्चिमेकडून फोडून अतिक्रमण केलेले असून सदर क्षेत्र हे निश्चित करणे अत्यावश्यक आहे. सदरचे अतिक्रमण हे प्रतिवादी यांनी दावा दाखल कालावधीमध्ये केलेले असून कोवीड–१९ म्हणजे सन २०१९–२०, २०२०–२१ या दोन वर्षात थोडे–थोडे करुन केलेले असल्यामुळे व सदरच्या दरम्यान न्यायालयीन कामकाज स्थगीत असल्यामुळे वादी न्यायालयास सदरची बाब अवगत करु शकले नाही. परंतु सदर अतिक्रमणाबाबत प्रस्तूत दाव्याकामी दुरुस्ती करुन दाद मागणे गरजेचे आहे, असे वादी यांचे कथन आहे. वादी यांनी प्रस्तूत अर्जान्वये दाव्यामध्ये

परिच्छेद क्रमांक ३ नंतर परिच्छेद क्रमांक ३–अ ते ३–क अतिक्रमणाच्या मजकुराबाबतची समाविष्ट करुन मागितलेले असून प्रस्तूत दुरुस्तीअन्वये दावा मिळकतीतील अतिक्रमणीत जमिनीचा ताबा मिळणेबाबतची दाद सामील होऊन मागितली आहे.

३) प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे म्हणणे दाखल करुन तीव्र विरोध दर्शविलेला आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे वादी यांची सदरची मागणी ही बेकायदेशीर स्वरुपाची आहे. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये कोणतेही अतिक्रमण केलेले नाही. वादी यांना दावा दाखल करण्याचे कारण हे दिनांक २५.०३.२०१५ रोजी घडले आहे व अतिक्रमणासाठी वादी यांनी दिनांक ३०.०५.२०२२ रोजीचे कारण दाखविले आहे, त्यामुळे एका दाव्यात दोन वेगवेगळी वादकारणे दुरुस्तीअन्वये समाविष्ट करता येणार नाही. त्यांनी पुढे असे कथन केले की, प्रस्तूत दुरुस्तीने दाव्यातील मूळ वादपत्राचे स्वरुप बदलत आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

४) प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील प्रतिवादी क्र. १ व २ यांचे म्हणणे तसेच संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ तसेच प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे सन्माननिय विधीज्ञ यांचा सखोल युक्तीवाद ऐकला.

६) अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा दावा वादी यांनी

प्रतिवादी क्र. १ व २ यांचे विरुध्द मौजे–हसनाबाद येथील गट क्र. २१८ क्षेत्र १ हे. ७४ आर. या चतुःसिमांकीत मिळकतीबाबत निरंतर मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला असून प्रतिवादी क्र. १ व २ यांनी हजर होऊन नि. क्र. १४ येथे कैफियत दाखल केलेली असून माझे सन्माननिय पुर्वाधिकारी यांनी नि.क्र. १९ येथे वादमुद्दे निश्चित केलेले असून त्यापासून प्रस्तुतचा दावा हा न्यायचौकशीसाठी प्रलंबित आहे, परंतु अद्याप वादीतर्फे सरतपासाचे शपथपत्र दाखल झालेले नसून न्यायचौकशी सुरु झालेली नाही. अशा परिस्थीतीत प्रस्तूत अर्जाचा न्यायनिर्णय करीत असतांना प्रस्तुत दाव्याकामी अद्याप न्यायचौकशी सुरु झालेली नसल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६ नियम १७ चे परंतुकाचा विचार न करीता प्रस्तुत अर्ज न्यायनिर्णीत करीत असतांना वादी मागणी करीत असलेली दुरुस्ती ही प्रस्तुत दाव्याचा खरा खुरा वादप्रश्न न्यायनिर्णीत करण्यासाठी आवश्यक आहे का? (Whether amendment sought is necessary to determining the real question in controversy between the parties) हे पाहणे गरजेचे आहे.

७) वादी यांच्या कथनाप्रमाणे प्रस्तुतचा दावा दाखल झाल्यानंतर दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये ३ ते ७ गुंठे क्षेत्रामध्ये दक्षिणोत्तर बांध फोडून अतिक्रमण केलेले आहे. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले आहे का ? ही बाब पुराव्याअंती ठरणार आहे.

त्याबाबत प्रस्तूत अर्जाकामी उहापोह करणे गरजेचे नाही. वादी यांचा मुळात दावा हा प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन वादी यांच्या कब्जे वहितीस हरकत अडथळा करु नये, याबाबतचा होता. आता वादी यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रलंबित असतांना दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केलेले आहे. दुरुस्तीचे वादकारण हे प्रस्तुतचा दावा दाखल झाल्यानंतर घडलेले आहे. जरी मुळचे वादकारण हे दिनांक २५.०३.२०१५ रोजीचे असले, तरी अतिक्रमणाबाबतची दुरुस्ती ही सदर वादकारणाशी संलग्नीत अशा स्वरुपाची आहे. त्यामुळे दोन वेगळी वादकारणे घडली असे म्हणता येणार नाही.

८) वादी यांचा मूळ दावा हा प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करु नये, याबाबतचा निंरतर मनाई ताकीदीचा होता व आता प्रतिवादी यांनी अतिक्रमण केले आहे ते वादी प्रस्तूत दुरुस्तीन्वये काढून मागु इच्छितात. त्यामुळे प्रस्तूत दुरुस्तीचे स्वरुप पाहिले असता, प्रस्तूत दुरुस्तीने मूळ दाव्यामध्ये कोणताही बदल होत नाही. प्रस्तुतची दुरुसती ही प्रस्तूत दाव्यातील पक्षकारांमधील खरा–खुरा वादप्रश्न निर्णीत करण्यासाठी अत्यंत आवश्यक स्वरुपाचे वाटते. प्रस्तुतच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी दुरुस्तीन्वये अतिक्रमणीत क्षेत्राचा ताबा मागणीसाठी वादी यांना दुसरा दावा करण्यास सांगणे हे केवळ प्रकरणांचे बाहुल्य (Multiplicity of Proceeding) वाढविण्यासारखे होईल. अशा परिस्थीतीत प्रस्तुतची दुरुस्तीची मागणी मंजूर करणे न्यायोचीत होईल. याउपर प्रस्तुची

दुरुस्तीची मागणी मंजूर केलेस प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्यांची जादा कैफियत दाखल करण्याची पूर्ण संधी आहे, त्यामुळे प्रस्तुतची दुरुस्तीच मागणी मंजूर केलेस प्रतिवादी क्र. १ व २ यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सदरची दुरुस्तीचे मागणी मंजूर करणे योग्य हाईल. परंतु सदर दुरुस्तीची मागणी करणेस वादी यांना जो विलंब झालेला आहे त्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करीत असतांना वादी यांच्यावर खर्च बसविणे हे देखील गरजेचे आहे. त्यामुळे न्यायाचा समतोल साधला जाईल. ***सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.***

## // आ दे श //

१) वादी यांचा प्रस्तुतचा निशाणी क्र. २५ चा अर्ज खर्च रक्कम ₹३००/– (रुपये तीनशे फक्त) प्रतिवादी क्र. १ व २ यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी पुढील तारखेपर्यंत वा तत्पूर्वी प्रतिवादी यांना रक्कम ₹३००/– (रुपये तीनशे फक्त) खर्च देण्याचा आहे.

३) वादी यांनी वरीलप्रमाणे वादपत्रामध्ये दुरूस्ती सदर आदेशापासुन १४ दिवसाचे आतमध्ये करणेची आहे.

४) वादी यांनी वादपत्र दुरूस्ती केल्यानंतर दुरूस्ती वादपत्र प्रकरणामध्ये दाखल करण्याची आहे.

५) वादी यांनी अतिक्रमण क्षेत्राच्या कब्जे मागणीसाठीचे योग्य ते न्यायालयीन मुद्रांक शुल्क देखील पुढील तारखेस न्यायालयात भरणेचे आहे.

Digitally signed by CHAITANYA SUNILDATTA DESHPANDE
Date: 2022.11.04 13:55:01 +0530

ठिकाण : भोकरदन
दिनांक: ०४/११/२०२२

(सी. एस. देशपांडे)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
भोकरदन.